# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.05.2025** **वार-मंगळवार**

---

**<u>नारळीकरनिधन</u>**

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ आणि लेखक डॉ. जयंत नारळीकर यांचं आज पुण्यातील त्यांच्या राहत्या घरी, वृद्धापकाळामुळे निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. विज्ञान आणि प्रामुख्यानं खगोलशास्त्र या विषयात डॉ. नारळीकर यांनी बहुमोल कार्य केलं.  पुण्यातील आयुकाची स्थापना करून त्यांनी खगोल शास्त्र विषयातील संशोधनाला चालना दिली. त्यांच्या कार्यांची दखल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली असून त्यांना डॉ. भटनागर स्मृती पारितोषिक, एम. पी. बिर्ला सन्मान यासह अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आलं आहे. भारत सरकारनं १९६५मध्ये पद्मभूषण, आणि २००४मध्ये पद्मविभूषण सन्मान देऊन त्यांचा गौरव केला. केवळ संशोधन क्षेत्रात कार्यरत न राहता त्यांनी लेखनाच्या माध्यमातून विज्ञानवादाचा प्रसारही केला. वैज्ञानिक विषयावरील विविध लेखांबरोबरच त्यांनी लिहिलेल्या विज्ञान कथाही खूप गाजल्या. अंतराळातील भस्मासुर, अंतराळ आणि विज्ञान, आकाशाशी जडले नाते, सूर्याचा प्रकोप ही त्यांची काही गाजलेली पुस्तकं. 94व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपदही डॉक्टर नारळीकर यांनी भूषावलं होतं. त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

**<u>pcmc</u>**

पिंपरी चिंचवड शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी पिंपरी चिंचवड महापालिका, शहर उपजीविका कृती आराखडा तयार करत आहे. महापालिका आयुक्त आणि प्रशासक शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली या शहर उपजीविका कृती आराखड्याबाबत सखोल चर्चा आणि मार्गदर्शनासाठी उद्या म्हणजे २१ आणि २२ मे  रोजी विशेष गट चर्चेचं आयोजन करण्यात आलं आहे. या चर्चेमध्ये विविध शासकीय विभागांचे अधिकारी, सामाजिक संस्था, खाजगी क्षेत्र, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

**<u>पुणेबालपुस्तकजत्रा</u>**

मुलांना पारंपरिक खेळ आणि पुस्तकांची गोडी लागावी या उद्देशानं पुण्यात येत्या २२ ते २५ मे या कालावधीत पुणे बाल पुस्तक जत्रा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गणेश कला क्रीडा केंद्र इथं होणाऱ्या या कार्यक्रमांचं उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांच्या हस्ते होणार आहे. पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी आज याबाबत माहिती दिली.

**<u>सावित्रीदालन</u>**

पुणे जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद अभियान आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या वतीने पुणे विमानतळावर भव्य "सावित्री दालन" उपलब्ध करून देण्यात आलं आहे. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील बचत गटांची उत्पादनं देश परदेशातील प्रवाशांना विमानतळावरच खरेदी करता येतील. राज्याचे ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री  जयकुमार गोरे यांनी आज पुणे विमानतळावरील सावित्री दालनाला भेट देऊन पाहणी केली.

**<u>पुणेजि.प.</u>**

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी  गजानन पाटील यांनी मार्केटयार्ड आणि कोथरूड इथल्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागा विकासित करण्याच्या दृष्टीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर नुकतंच सादरीकरण केलं. यात बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी या जागांचा नियोजनबद्ध विकास, त्यातून निर्माण होणाऱ्या सुविधा, महसूलवाढीच्या संधी, आदींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी   विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार,  मुख्य अभियंता अतुल चव्हाण उपस्थिती होते.

**रामगान**

रामायणातील रामजन्मापासून ते रावणवध आणि त्यानंतर श्रीरामांचा राज्याभिषेक अशा विविध प्रसंगावर रचलेल्या बंदिशींचं सादरीकरण आणि त्याच प्रसंगांवर रेखाटलेल्या चित्रांचं प्रदर्शन असा अनोखा कलाविष्कार 'रामगान - दृक-श्राव्य' या कार्यक्रमातून पुणेकर रसिकांना अनुभवता येणार आहे. येत्या शनिवारी  संध्याकाळी साडे पाच वाजता भारतीय विद्या भवनच्या नातू सभागृहात होणारी ही आगळीवेगळी दृक-श्राव्य मैफल सर्वांसाठी विनामूल्य खुली असेल. आविष्कार क्रिएशन्स, भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशननं संयुक्तपणे याचं आयोजन केलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. या जोरदार पावसामुळे शहरातील अनेक रस्ते जलमय झाले होते, तसंच ठीकठिकाणी वाहतूक कोंडीही झाली होती. उद्याही सोसाट्याचा वारा आणि विजांसह पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह , नमस्कार.**